# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,<br>नवीन मुख्यालय, ३ रा मजला,<br>बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.<br>दिनांक २७ ऑक्टोबर २०१४.

## <u>निवेदन पत्रिका</u>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, **<u>महानगरपालिकेची नोव्हेंबर २०१४ ची सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे भरेल.

२. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, नोव्हेंबर २०१४ महिन्याच्या सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४४ अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त ५ (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त ३ (तीन) ) <u>महापालिका सचिव</u>** यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

| | |
|---|---|
| १. ठरावाच्या सूचना. | : शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०१४ पर्यंत. |
| २. महाराष्ट्र म.अधि.कलम ४४ अन्वये विचारावयाचे प्रश्न. | : शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०१४ पर्यंत. |

**मा.महापौरांच्या आदेशावरुन,**

सही/-<br>**(चित्रा बाविस्कर )**<br>**महापालिका सचिव (प्र),**<br>**नवी मुंबई महानगरपालिका.**